**संक्षिप्त फौजदारी खटला क्रं.१६२/२०२३**
**निशाणी क्र.१२ लगत.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१– श्री. संदिप निवृत्ती दोडके यांची जबानी**
**मी शपथपुर्वक सांगतो की,**
**माझे नाव :** **श्री.संदिप निवृत्ती दोडके,**
**वय :** ३२ वर्षे, **व्यवसाय :** शेती
**राहणार :** कडेगांव,ता.कडेगाव,जि.सांगली
**सरतपास सरकार पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए.ए.सगरे यांचेकडून –**

**०१.** दि.२८/०१/२०२३ रोजी कडेगांव पोलीसांनी मला कडेगांव पोलीस ठाण्यात एका कागदावर सही करण्यासाठी बोलावले होते. त्याप्रमाणे मी कडेगांव पोलीस ठाण्यात गेलो होतो. तेथे मी एका कागदावर सही केली होती. त्या कागदामध्ये काय मजकूर लिहिला होता हे मला माहित नाही. माझे सहीचा कागद पाहिल्यास मी माझी सही ओळखू शकतो. आता मला दि.२८/०१/२०२३ रोजीचा घटनास्थळ व मुद्देमाल देशी दारू पहिली धारच्या २६ सिलबंद बाटल्यांच्या जप्तीचा पंचनामा दाखवला. त्यावर अ.क्र.२ येथे पंच म्हणून माझी सही आहे. परंतु, त्यामधील मजकूर मला माहित नाही. त्यामधील मजकूर मला माहित नाही. **(दि.२८/०१/२०२३ रोजीच्या घटनास्थळ व मुद्देमाल देशी दारूच्या बाटल्यांच्या जप्तीच्या पंचनाम्यावरील अ.क्र.२ येथील साक्षीदाराच्या सहीला निशाण क्र.पी–१/१ देण्यात येते.)** पोलीसांनी माझे समक्ष काहीही केलेले नव्हते.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नाही म्हणून सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारणेची तोंडी अनुमती मागितली. त्यांना भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार अनुमती देण्यात येते).**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, दि.२८/०१/२०२३ रोजी कडेगांव पोलीसांसोबत मी रायगांव फाटा येथे आरोपी भारती तामचीकर हिच्या घराच्या पाठीमागे छापा टाकण्यासाठी गेलो असता माझेसमक्ष पोलीसांनी आरोपी भारती तामचीकर हिला छापा टाकून पकडले असता आरोपीच्या ताब्यातून देशी दारु पहिली धारच्या ९० मि.ली. मापाच्या २६ सिलबंद बाटल्या जप्त करुन माझेसमक्ष घटनास्थळ व मुद्देमाल जप्ती पंचनामा केला होता आणि त्यामधील दोन बाटल्या नमुन्यासाठी काढून घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मदत करण्यासाठी माझेसमक्ष पंचनामा झाला नाही असे मी खोटे सांगतो.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.ननवरे यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

**माझे समक्ष नोंदविले व**
**श्रवणोत्तर स्विकृती**
**सही/–**
**(श्रीमती माधवी र. पाटकर)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,कडेगाव .

दिनांक : ११/०३/२०२५.
स्थळ : कडेगाव.